| MHJN100000532007 | दाखल दिनांक : १२/०२/२००७<br>नोंदणी दिनांक : १२/०२/२००७<br>निकाल दिनांक : **२५/०५/२०२६**<br>कालावधी : **१९वर्ष, ०३ म., १३दि.** |
|---|---|

**भाग – अ**

**मंठा येथील न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, (न्यायालय क्र.०१ ) यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी – **श्रीमती एल. पी. धन्वे,** प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी)

**नि.क्र. ९७**

नि. फौ. ख. क्र. ७६१/२००८

(गुन्हा क्र. १५०/२००६ **मंठा** पोलिस स्टेशन)

**फिर्यादी –** **महाराष्ट्र सरकार तर्फे**
पोलीस ठाणे अधिकारी **मंठा,**
ता. मंठा जि. जालना.

**सरकारतर्फे विधिज्ञ –** श्री. एल.आर. पांचाळ, सहा. सरकारी अभियोक्ता.

**– विरुध्द –**

**आरोपी –**
१) **संजयकुमार सुरेशचंद्र अग्रवाल,**
वय ३७ वर्ष,
रा. मौजे बोधवाड, ता. जामनेर, जि. जळगांव,
ह.मु. केंधळी, ता. मंठा, जि. जालना
२) **पवन सुभाष जैन (मयत),**
३) **मनोज हरीप्रसाद शर्मा,**
वय २३ वर्ष,
रा. मौजे नांद्रा हवेली, ता. जामनेर, जि. जळगांव,

ह.मु. केंधळी, ता. मंठा, जि. जालना

४) **सतीष गुणवंता पाटील,**
वय २० वर्ष,
रा. मौजे चिंचोली जोगन, ता. औसर, जि. लातूर,
ह.मु. केंधळी, ता. मंठा, जि. जालना

५) **विनोद गोवर्धन अग्रवाल (मयत),**

**आरोपींतर्फे विधीज्ञ** – श्री. डी.एस. लिंबुळकर, श्री. एस.ऐ. पठाण

**भाग–ब**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १७/११/२००६ |
| फिर्याद दाखल दिनांक | १७/११/२००६ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ०८/०२/२००७ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | ०४/१०/२०१८ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २३/१०/२०१८ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखुन ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | **२५/०५/२०२६** |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनावर सोडल्याचा दिनांक | गुन्ह्याचे कलम | दोषी/ निर्दोष | शिक्षा | फौ. प्र. सं. कलम ४२८ च्या उद्देशाकरीता आरोपी खटल्या दरम्यान |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | | तुरुंगामध्ये असल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **संजयकुमार सुरेशचंद्र अग्रवाल** | दिनांक १७.११. २००६ | दिनांक १८.११. २००६ | भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| २. | **पवन सुभाष जैन** | दिनांक १७.११. २००६ | दिनांक १८.११. २००६ | भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| ३. | **मनोज हरिप्रसाद शर्मा** | दिनांक १७.११. २००६ | दिनांक १८.११. २००६ | भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| ४. | **सतीष गुणवंत पाटील** | दिनांक १७.११. २००६ | दिनांक १८.११. २००६ | भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |
| ५. | **विनोद गोवर्धन अग्रवाल** | दिनांक २९.११. २००६ | दिनांक ०३.१२. २००६ | भारतीय दंड संहितेचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये | **निर्दोष मुक्तता** | निरंक | निरंक |

## भाग – क

सरकार/बचावपक्ष/न्यायालयातर्फे साक्षीदारांची यादी –

अ. सरकारतर्फे साक्षीदार

| **अ. क्र.** | **नाव** | **पुराव्याचे स्वरुप** |
|---|---|---|
| १. | चॉदखा शरीफखा पठाण | पंच साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| २. | प्रकाश सदाशिवराव बोराडे | पंच साक्षीदार |
| ३. | रावसाहेब रामराव भावले | साक्षीदार |

ब. बचावपक्ष साक्षीदार – निरंक.

क. न्यायालयातर्फे साक्षीदार – निरंक.

सरकारतर्फे/बचावपक्षतर्फे/न्यायालयातर्फे निशाणी क्रमांकाची यादी.

अ. सरकारतर्फे –

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

ब. बचावपक्षतर्फे – निरंक.

क. न्यायालयातर्फे – निरंक.

ड. भौतीक – वस्तु

| **अ.क्र** | **भौतीक–वस्तु क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१.** | पि.आर.क्र. ०९/२०२३ दि. १८/०१/२०२३ | एक किबोर्ड लॉजी रोज कंपनीचा |
| **२.** | | एक किबोर्ड लॉजी रोजी कंपनीचा |
| **३.** | | एक सि.पी.यु. एल.जी. कंपनीचा |
| **४.** | | एक सि.पी.यु. एल.जी. कंपनीचा |
| **५.** | | एक मॉनिटर एल.जी. कंपनीचा |
| **६.** | | एक मॉनिटर एल.जी. कंपनीचा |

| | | |
|---|---|---|
| ७. | | एक माऊस लॉजीरोज कंपनीचा |
| ८. | | एक लहान प्रिन्टर टी.व्ही.एस. कंपनीचा |
| ९. | | पवन सुभाष जैन यांच्या ताब्यातून जप्त केलेली पत्र्याची पेटी ज्यात रोख रक्कम १८९३० |
| १०. | | सतिष पाटील यांच्या ताब्यातून जप्त केलेली पत्र्याची पेटी ज्यात रोख रक्कम ४२६० |
| ११. | | एक पिवळे रंगाचे बूक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले व ज्यावर ०१२००१ ते ०१२१४९ पर्यंत पावती फाडलेली व ०१२१५० ते ०१२२०० पूर्व ज्यावर प्रत्येकी १५ रुपये किंमत असलेले |
| १२. | | एक पिवळे रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले १३०६०१ ते १३०७५० पर्यंत पावती फाडलेली व १३०७५८ ते १३०८०० ज्यावर १० रुपये किंमत असलेले |
| १३. | | एक पिवळे रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले १३१२०१ ते १३१२३५ पर्यंत पावती फाडलेली व १३१२३६ ते १३१४०० ज्यावर १० रुपये किंमत असलेले |
| १४. | | एक पिवळे रंगाचे बुक ज्यावर |

| | | |
|---|---|---|
| | | एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ००१००१ ते ००१६४ पर्यंत पावती फाडलेली व १२३१७ ते १२२४०० ज्यावर १५ रुपये किंमत असलेले |
| १५. | | एक लाल रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ००१००१ ते ००११६४ पर्यंत पावती फाडलेली व ००११६५ ते ००१२०० ज्यावर ५० रुपये किंमत असलेले |
| १६. | | एक लाल रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ००१२०१ ते ००१२१९ पर्यंत पावती फाडलेली व ००१२२० ते ००१४०० ज्यावर ५० रुपये किंमत असलेले |
| १७. | | एक लाल रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ०५१८०२ ते ०५१८५९ पर्यंत पावती फाडलेली व ०५१८६० ते ००५१९९ ज्यावर ६० रुपये किंमत असलेले |
| १८. | | एक लाल रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ००२८०१ ते ००२८५८ पर्यंत पावती फाडलेली व ००२८५९ ते ००२९९९ |

| | | |
|---|---|---|
| | | ज्यावर १०० रुपये किंमत असलेले |
| १९. | | एक हिरव्या रंगाचे बुक ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. असे लिहिलेले ०१३२०२ ते ०१३२६९ पर्यंत पावती फाडलेली व ०१३२७० ते ०१३४०० ज्यावर ४० रुपये किंमत असलेले |
| २०. | | ४० रु दराची १५ नग बनावट पांढ–या रंगाचे संगणक पावत्या ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र दि. १७/११/०६ कॉनट्रक्ट व्ही.जी. अग्रवाल असे इंग्रजीत लिहीलेले १५ नग पावत्या |
| २१. | | एक पांढरे रंगाची पावती तयार करण्याचे संगणक मधिल कागदाचे कोरे रोल |
| २२. | | ९० रु दराची ३१ नग बनावट पांढ–या रंगाचे कॉम्प्युटर पावत्या तयार केलेल्या ज्यावर एम.एस.आर.डी.सी. लि लि. गव्ह. ऑफ महा. दि. १७/११/०६ कॉनट्रक्ट व्ही.जी. अग्रवाल असे इंग्रजीत लिहिलेले असून १३ पावत्या |
| २३ | | ६० रु दराच्या ७ नग पावत्या ज्यावर पांढ–या रंगाचे संगणक पावत्या ज्यावर एम.एस.आर.डी.सी.लि. गव्ह. ऑफ महा. दि. १७/११/०६ असे इंग्रजीत लिहिलेले |
| २४. | | एक पांढ–या रंगाची १५० रु दराची पावती |

| | | |
|---|---|---|
| | | हरिराम यांच्या ताब्यातून जप्त केलेली |
| २५. | | एक हिरव्या रंगाचे पावती बुक ज्यावर एम.एस. आर.डी.सी. लि.असे लिहिलेले ००७४०१ ते ००७४५१ पावेतो पावती फाडलेली व ००७४५२ ते ००७६०० पुर्ण ९० रु प्रत्येकी किंमत असलेले |
| २६. | | एक हिरव्या रंगाचे पावती बुक ज्यावर एम.एस. आर.डी.सी. लि.असे लिहिलेले ०४२४०१ ते ०४२४३६ पावेतो पावती फाडलेली व ०४२४३७ ते ०४२६०० पुर्ण २० रु प्रत्येकी किंमत असलेले |

## न्या य नि र्ण य

( दिनांक २५/०५/२०२६ रोजी पारीत )

आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे की** :–

२. सरकारतर्फे फिर्यादी होवून सुरेश हिरभाऊ नाईकनवरे यांनी अशी फिर्याद दिली की, दि. १७/११/२००६ रोजी ते रात्रगस्त व रोडपेट्रोलिंग करीत असतांना त्यांच्यासोबत हे.कॉ. ११६ भावले, पो.कॉ. साळवे ब.न. ११७१, पो.कॉ. बावणे ब.न.

२६४, पो.कॉ. शिंदे ब.न. ८०९ असे असतांना हायवेरोडवरील केंधळी टोल नाका येथे पोहोचले असता तेथून त्यांच्याकडे दोन ट्रक चालक धावत आले व म्हणाले की, टोलनाक्यावरचे लोक बोगस पावती बनाकर हमे लूट रहे है. जबरदस्ती करके टोल की फीस ले रहे है, ये एक गाडी के पिछे १५० रुपये ज्यादा लेके हकमो लूट रहे है और ओरिजनल पावती बजाए डुप्लीकेट पावती दे रहे है, और दि. १४/११/०६ को हम ये गाडी ट्रक बडोदा से हैद्राबाद गये थे तो उस वक्त भी ये लोगो ने हमसे जबरदस्ती करके १५० रुपये लिया था वो पावती भी मेरे पास है, वह पावती बगर नंबर की है! त्यानंतर त्यांनी त्यांचे नाव व गाव सांगितले व त्यांच्याकडील पांढ-या रंगाची दि. १४/११/२००६ ची पावती ज्यावर१५० रु. किंमत असलेली सादर केली. त्यानंतर फिर्यादीने ती पावती पंचासमक्ष जप्त करुन तेच पंच व स्टाफसह ते टोलनाक्याजवळ गेले तिथे संजयकुमार सुरेशचंद्र अग्रवाल, पवन सुभाष जैन, संतोष गुणवंत पाटील, मनोज हरिप्रसाद शर्मा हे होते. फिर्यादीने त्यांना परिचय देवून टोलनाक्याच्या पावत्या तपासण्याचा उद्देश कळवून त्यांच्या कॅबिनची झडती घेतली व पंचासमक्ष मुद्देमाल जप्त केला. त्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशन येथे जावून पोलीस स्टेशन मंठा, ता. मंठा, जि. जालना येथे तक्रार दिली.

३. फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोलीस स्टेशन, मंठा येथे अपराध क्र. १५०/२००६ नुसार आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४२०, ४६८, ४७१

सह कलम ३४ अन्वये गुन्हा नोंद केला. घटनेचा तपास पोलीस उपनिरीक्षक श्री. एस.एच. नाईकनवरे यांच्याकडे सोपविण्यात आला. तपासी अधिकारी याने घटनास्थळ पंचनामा तयार केला. तसेच साक्षीदारांचे जवाब नोंदविले. मुद्देमाल जप्त करुन मुद्देमाल पावती तयार केली. तपासाअंती आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये दोषारोप पत्र दाखल केले.

**४.** माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४२०, ४६८, ४७१ सह कलम ३४ अन्वये नि.क्र. २७ वर दोषारोप निश्चीत केले. आरोपींची जबानी नि.क्र. २८ ते ३१ वर नोंदविण्यात आली. दोषारोपातील मजकुर आरोपींना मराठी भाषेतुन वाचुन व समजावुन सांगीतला. आरोपींनी गुन्हा **नाकबुल** करुन संपरीक्षेस जाण्याची तयारी दर्शविली. साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. खटला चालवित असतांना आरोपींविरुध्द गुन्हया संदर्भात कोणतीही विधाने आली नसल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ३१३ (१) प्रमाणे आरोपींची जबानी नोंदविण्यात आली नाही. आरोपी क्र. २ पवन सुभाष जैन मयत झाल्यामुळे माझे पुर्वपिठासीन अधिकारी यांनी आरोपी क्र. २ यांना प्रकरणातून अबेट केले. आरोपींच्या विधिज्ञांनी आरोपी क्र. ५ विनोद गोवर्धन अग्रवाल यांचे मृत्युप्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केल्यामुळे नि.क्र. १ वर आदेश पारीत करुन आरोपी क्र. ५ यांना प्रकरणातून

अबेट करण्यात आले. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला.

**५.** खटल्यातील वरीलप्रमाणे आलेल्या माहीतीवरुन माझे समोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यावरील कारणमिमांसेसह निष्कर्ष मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ. क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १७/११/२००६ रोजी रात्री ०३.०० ते ०५.३० वाजेच्या सुमारास मौजे केंधळी, ता. मंठा येथील टोल नाक्यावर आरोपींनी संगनमत करुन खोटया पावत्या तयार केल्या व जास्तीचा टोल घेवून फसवणुक केली आणि अशाप्रकारे भारतीय दंड संहितेचे कलम ४२० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| २. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन जास्तीची रक्कम वसुल करण्यासाठी टोल नाक्याच्या खोटया पावत्या तयार केल्या व त्या बनावट पावत्या आहेत हे माहिती असतांना सुध्दा जास्तीचा टोल वसुल केला आणि अशाप्रकारे भारतीय दंड संहितेचे कलम ४६८ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **.. नाही.** |
| ३. | वरील नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन टोल नाक्याच्या खोटया पावत्या तयार केल्या व त्या बनावट पावत्या आहेत हे माहिती असतांना सुध्दा त्या ख–या | **.. नाही.** |

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| | असल्याचे भासवूण जास्तीचा टोल वसुल केला आणि अशाप्रकारे भारतीय दंड संहितेचे कलम ४७१ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | |
| ४. | आदेश काय ? | **<u>आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात येते.</u>** |

**<u>का र ण मि मां सा</u>**

६. प्रस्तुत खटल्यातील मुद्दा क्रमांक १ ते ३ हे एकमेकांशी निगडीत असून एकाच घटनेचा भाग असल्याने मी पुनरावृत्ती टाळण्यासाठी मुद्दा क्रमांक १ ते ३ हे एकत्रीतरित्या विचारात घेत आहे.

**<u>मुद्दे क्र.१ ते ३ करीता</u> :-**

७. प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. १ चॉदखा शरीफखा पठाण (घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच) यांची साक्ष नि.क्र. ३३ वर नोंदविली. साक्षीदार क्र. २ प्रकाश सदाशिवराव बोराडे (घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच) याची साक्ष नि.क्र. ३६ वर नोंदविली. साक्षीदार क्र. ३ रावसाहेब रामराव भावले (साक्षीदार) यांची साक्ष नि.क्र. ७७ वर नोंदविली. वारंवार संधी देवून देखील अभियोग पक्षातर्फे फिर्यादी अथवा ईतर स्वतंत्र साक्षीदाराची साक्ष नोंदविण्यात आली नाही.

८. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ चॉंदखा शरीफखा पठाण हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच असून त्यांनी त्यांच्या सरतपासात नमुद केले आहे की, दि. १७/११/२००६ रोजी दुपारी ०३.४० वाजता पोलीसांनी त्यांना घटनास्थळ व जप्तीपंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलाविले होते. त्यावेळी दुसरा पंच कोण होता हे त्यांना आठवत नाही. तेथे पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. त्यांच्यासमक्ष पोलीसांनी काहीही केले नाही. तसेच पोलीसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. या साक्षीदाराने पंचनाम्यावरील त्याची सही ओळखली मात्र मजकुराबाबत काहीही माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर साक्षीदाराचा अभियोग पक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला मात्र त्या दरम्यान देखील अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल असे काहीही या साक्षीदाराच्या उलटतपासात आलेले नाही.

९. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. २ प्रकाश सदाशिवराव बोराडे हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच असून त्यांनी त्यांच्या सरतपासात नमुद केले आहे की, दि. १५/१२/२००६ रोजी पोलीसांनी त्यांना घटनास्थळ व जप्तीपंचनामा करण्यासाठी पंच म्हणून बोलाविले नव्हते तसेच त्याबाबत माहिती ही दिली नव्हती. पोलीसांनी त्यांच्यासमक्ष आरोपींकडून काहीही जप्त केलेले नाही. ते बाजारात जात असतांना पोलीसांनी त्यांची सही घेतली होती. या साक्षीदाराने पंचनाम्यावरील त्यांची सही ओळखली मात्र त्यातील मजकुर माहिती नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराचा अभियोग पक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला मात्र त्या दरम्यान देखील अभियोग पक्षास सहाय्यक ठरेल असे काहीही या साक्षीदाराच्या उलटतपासात आलेले नाही.

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३ रावसाहेब रामराव भावले यांनी त्यांच्या सरतपासात कथन केले आहे की, ते सन २००६ मध्ये मंठा पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. या पदावर कार्यरत होते. दि. १७/११/२००६ रोजी पी.एस.आय. नाईकनवरे यांच्यासोबत त्यांची रात्रीगस्त व पेट्रोलींगची डयुटी होती. त्यावेळी नाईकनवरे यांच्यासोबत ते व ईतर तीन कर्मचारी कर्तव्यावर होते. ते पेट्रोलींग करत टोल नाका केंधळी येथे गेले असता दोन ट्कवाले त्यांच्याजवळ आले व त्यांनी सांगितले की, टोलनाक्यावरील कर्मचारी त्यांच्याकडून जास्त पैसे घेत आहेत व खोटया पावत्या देत आहेत. त्यानंतर त्यांनी टोलनाक्यावरील पावत्या व संगणक जप्त केले व पोलीस स्टेशन मंठा येथे घेवून आले. त्यानंतर पी.एस.आय. नाईकनवरे यांनी सरकारतर्फे फिर्याद नोंद केली. त्यानंतर आरोपींना अटक केले. गुन्हयाचा तपास पी.एस.आय. नाईकनवरे यांनी केला. त्यांनी संगणक व पावत्यांची जप्ती करुन जप्ती पंचनामा तयार केला. पोलींसानी त्यांचे बयाण त्यांच्या सांगण्याप्रमाणे नोंदविले होते. सदर साक्षीदाराचा आरोपींच्या विधीज्ञामार्फत उलटतपास घेण्यात आला. त्या दरम्यान या साक्षीदाराने हे मान्य केले आहे की, त्यांना जप्त पावत्यांचे क्रमांक सांगता येत नाहीत. तसेच पी.एस.आय. नाईकनवरे हे त्याच दिवशी मंठा पोलीस स्टेशन येथे रुजु झाले होते व तो त्यांचा कर्तव्याचा पहिलाच दिवस होता.

११. वरील सर्व साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. १ व २ हे घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याचे पंच असून त्यांच्या पुराव्यावरुन अभियोग पक्ष घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा निर्विवादपणे सिध्द करण्यास अपयशी ठरले आहेत. अभियोग पक्षाचे साक्षीदार क्र. ३ हे

पोलीस कर्मचारी असून त्यांनी त्यांच्या संपुर्ण पुराव्यात कुठेही जप्त करण्यात आलेल्या पावत्या खोटया होत्या असे नमुद केलेले नाही, किंवा बनावट पावत्या तयार केल्याचे सुध्दा नमुद केलेले नाही.

१२. अभिलेखावर उपलब्ध संपुर्ण पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, कोणत्याही साक्षीदाराने आरोपींनी टोल नाक्याच्या खोटया पावत्या तयार केल्या, त्या पावत्या ख–या असल्याचे भासवून जास्त रक्कमेची वसुली केली असे कथन केलेले नाही. त्यामुळे आरोपींनी खोटया व बनावट पावत्या तयार केल्या, त्या ख–या असल्याचे भासवून जास्त रक्कम वसुल केली व प्रवाशांची फसवणूक केली या बाबत कोणताही पुरावा अभिलेखावर उपलब्ध झाला नाही. तसेच एकाही साक्षीदाराने न्यायालयासमक्ष आरोपींना ओळखलेले नाही. त्यामूळे अभियोग पक्ष आरोपींविरुध्द लावण्यात आलेले आरोप निसंशयपणे सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. म्हणून मी मुद्दा क्र. १ ते ३ ला **नकारार्थी** उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.**

## आ दे श

१. आरोपी क्र. **१) संजयकुमार सुरेशचंद्र अग्रवाल**, आरोपी क्र. **३) मनोज हरिप्रसाद शर्मा,** आरोपी क्र. **४) सतिष गुणवंत पाटील** यांची फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ४२०, ४६८, ४७१ सहकलम ३४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयातुन **निर्दोष मुक्तता** करण्यात येते.

२. आरोपींचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. प्रकरणातील जप्त मुद्देमालापैकी अनुक्रमांक १ ते ८ वरील जप्त मुद्देमाल हा मुल्यवान असल्यामुळे त्याचा अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे लिलाव करण्यात यावा व आलेली रक्कम शासन जमा करण्यात यावी. जप्त मुद्देमालापैकी अनुक्रमांक ९ व १० वरील नगदी रक्कम शासन जमा करण्यात यावी. तसेच प्रकरणातील जप्त मुद्देमालापैकी अनुक्रमांक ११ ते २६ वरील मुद्देमाल हा मुल्यहिन असल्यामुळे अपिल कालावधीनंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम ४३७–अ प्रमाणे अपील कालावधीपर्यंत **प्रत्येकी रु.१५,०००/–** किंमतीचा वैयक्तीक जातमुचलका सादर करावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषीत करण्यात आला.)**

Digitally signed by LOTUS P DHANVE
Date: 2026.05.25 17:40:30 +0530

**( श्रीमती एल. पी. धन्वे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
मंठा.

दिनांक २५/०५/२०२६.

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणीत करण्यात येते की, पी.डी.एफ. संचिकेतील प्रत्येक शब्द न शब्द मुळ आदेशा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नावे – अक्षय ईश्वर देशपांडे
न्यायालयाचे नाव – दिवाणी न्यायालय (क.स्तर), मंठा
पिडीएफ दिनांक – २५/०५/२०२६

स्वाक्षांकीत/–
लघुलेखक